प्रेस नोट दिनांक २२/११/२०१७

# MIDC भोसरी पोलीस ठाणे पोलीसांची कामगिरी चाकुने भोकसून लुटमार करणारी टोळीस अटक करुन त्याचेकडून ०५ गुन्हे उघडकिस

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री. रावसाहेब बांबळे, हे डीबी स्टाफसह एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ३२३/२०१७ भादवि कलम ३९४,३९७,३४ अन्वये दाखल गुन्हयाच्या अनुशंगाने पोलीस ठाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करत असतांना पोलीस नाईक किरण काटकर व अमोल निघोट यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली लुटमार करण्यारी टोळी घरकुल चिखली, पुणे येथील आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने १) समीर अजीत पठाण वय-१८ वर्षे रा. नवजीवन हौ. सोसायटी ए-१५, फ्लॅट नं. १०१, घरकुल, चिखली, पुणे २) अक्षय एकनाथ कानडे वय-१९ वर्षे रा. बाळासाहेब कामठे यांचे खोलीत, तळवडे गावठाण, पुणे, ३) प्रसाद पांडुरंग भालेकर वय-१८ वर्षे नवजीवन हौ. सोसायटी ए-१५, फ्लॅट नं. १०५, घरकुल, चिखली, पुणे व त्यांचा एक अल्पवयीन साथीदार यांना सापळा रचून पकडण्यात आले, त्याचेकडे अधिक तपास करुन त्यांचेकडून एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं – ३२३/२०१७ भादवि कलम ३९४,३९७,३४, गुन्हा रजि नं. २७८/२०१७ भादवि कलम ३२६,३२३,५०४,३४, ३३२/२०१७ भादवि कलम ३९२,३४, निगडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ६४५/२०१७ भादवि कलम ३७९ व विश्रामबाग पोलीस ठाणे, पुणे गुन्हा रजि. नं. ४०१/२०१७ भादवि कलम ३७९ हे गुन्हे उघडकीस आणून त्यांचेकडून किं रु १,४२,०००/- किंमतीचे चार मोबाईल तसेच दोन पॅशन प्रो मोटार सायकल व एक डिस्कव्हर मोटार सायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उपायुक्त श्री गणेश शिंदे तसेच मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.राम मांडुरके यांचे मार्गदर्शनाखाली MIDC भोसरी पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भिमराव शिंगाडे व पोलीस निरीक्षक (गुन्हे)

श्री. राजेंद्र विभांडीक, तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक रावसाहेब बांबळे, संजय गायकवाड, सहा. पोलीस फौजदार बेंडाळे, पोलीस हवालदार अजय भोसले रविंद्र तिटकारे, पोलीस नाईक किरण काटकर प्रणिल चौगले, मोहन जाधव, पोलीस शिपाई अमोल निघोट, नवनाथ पोटे, करन विश्वासे, विशाल काळे, अनिल राक्षे, यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक रावसाहेब बांबळे हे करीत आहेत.